# माहे मार्च २०२४ महाचा मासिक अहवाल
## मासिक□अहवालामध्ये खालील घटकां□ी चांगली  कामगिरी केलेली आहे.

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | सिम्बा (डॉबरमन) | १) पो.हवा. २८६३ चेतन सुरेश गायकवाड<br><br>२) पो.शि.१०७५३ बालाजी बिन्देश्वरी ठाकुर | कोंढवा पोलीस स्टेशन गु.र.नं. २४/२०२४ भा.द.वि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दि.९/१/२०२४ रोजी २०:३७ वा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये इसम नामे मोहम्मद नसीम उर्फ समीर सईदुल्लाह अन्सारी याचा कोणीतरी अज्ञात इसमाने खून केला आहे.<br>श्वान सिम्बा यास घटनास्थळावरील मयत इसमाच्या अंगात घातलेल्या पॅन्टचा वास दिला असता श्वान सिंम्बा घटनास्थळावरून पुर्वेकडे शंभर फुट अंतरावर जावून परत उत्तरेस शंभर फुट गेला. तेथुन पुर्वेस २५० फुटावर पिरॅमिट हातीम हील नविन एफ बिल्डींगचे बाजूस मेन गेट समोर येवुन थांबला. सदर ठिकाणी असलेल्या संशयीत आरोपी नामे - कमल रोहीत ध्रुव, वय १९ याच्या हाताचा वास श्वान सिंम्बा यास दिला असता श्वानाने घटनास्थळावरून मार्ग काढत आलेल्या मार्गाने परत घटनास्थळावरील मयत इसमाजवळ जावुन श्वान थांबला.<br>अशाप्रकारे दाखल गुन्हयामधे श्वान सिंम्बा याने व त्याचे हस्तकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | भंडारा | ब्रुनो (लॅब्राडोर) | १) पो.हवा./ ९४४ सतिशकुमार गिरीपुंजे<br><br>२) पो.ना./१०४८ अशिष बडवाईक | स्थानिक गुन्हे शाखा भंडारा यांनी फोनव्दारे कळविलेवरून श्वान पथक घटनास्थळावर पोहचले असता. चौडेश्वरी माता मंदीराचे लगतच्या रोडचे बाजूला अज्ञात इसमाने संशयीत पांढ-या रंगाच्या पोते फेकुन दिले होते. सदर पोत्याचा वास श्वान ब्रुनो यास दिला असता त्याने भुंकून सदर पोत्यामध्ये अंमली पदार्थ असल्याचा इशारा दिला. सदर पोत्याची पोलीस पथकाने तपासणी केली असता त्यामध्ये अंमली पदार्थ (गांजा) १२.३५५ कि.ग्रॅ. वजनाचा मिळून आला.<br>अशाप्रकारे श्वान ब्रुनो व त्याचे हस्तकांनी आरोपीस शोधणे कामी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



अशा प्रकारे माहे **मार्च २०२४** मध्ये श्वान पथकामार्फत खून - १, एनडीपीएस ॲक्ट - १ असे एकूण - ०२ गुन्हे उघडकीस आले आहेत.